# विलास शिंदेंनी घेतली उपमुख्यमंत्री शिंदेंची भेट

**नाशिक | प्रतिनिधी**

शिवसेना उबाठा गटाचे महानगरप्रमुख तथा ज्येष्ठ नेते विलास शिंदे यांच्या कन्येच्या नुकत्याच झालेल्या विवाह सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली. त्यानंतर रविवारी (दि. ८) नाशिकमध्ये शिंदे गटाचे शिक्षक आमदार किशोर दराडे आणि ज्येष्ठ नेते अजय बोरस्ते यांच्या परिवारातील विवाह सोहळ्यास जाताना दुगाव फाटा येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांची विलास शिंदे यांनी भेट घेऊन त्यांचे स्वागत केले. त्यामुळे दोन दिवसांपूर्वीच शिवसेनेच्या बैठकीला दांडी मारणारे विलास शिंदे लवकरच शिंदे सेनेत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भारतीय जनता पक्षाचे संकट मोचक म्हणून ओळख असलेले जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकमध्ये उबाठा गटात राजकीय भूकंप होणार असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक दौऱ्यात उबाठा उपनेते सुधाकर बडगुजर यांनी भेट घेत मागण्यांचे निवेदन दिले. दुसऱ्या दिवशी उबाठा जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषद घेत वरिष्ठांच्या आदेशानुसार बडगुजर यांना निलंबित करण्यात आल्याची घोषणा केली. उबाठा गटाने दत्ता गायकवाड यांना तत्काळ उपनेते पद दिले. त्यानंतर नाशिकच्या पदाधिकाऱ्यांना मुंबईत मातोश्रीवर बैठकीसाठी पाचारण करण्यात आले होते. या बैठकीस विलास शिंदे यांनी घरगुती कारणास्तव आपण बैठकीस येऊ शकणार नाही, असे जिल्हाप्रमुख, उपनेते यांना सांगितले होते.

### मंत्र्यांची नाशिकमध्ये विवाहास हजेरी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, शालेय शिक्षणमंत्री, दादा भुसे, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज नाशिकमध्ये विविध नेत्यांच्या मुला-मुलींच्या विवाहात उपस्थित राहून शुभआशीर्वाद दिले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, माजी आमदार नरेंद्र दराडे, तसेच माजी नगरसेवक दीपक दातीर यांच्याकडील विवाहाला त्यांनी हजेरी लावली.

## नदीपात्र की लॉन्स....?



नाशिक महापालिकेकडून पानवेली हटविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो. मात्र पानवेली काही हटता हटत नसल्याचे दिसून येत आहे. व्हिक्टोरिया पुलाखाली गोदावरी नदीचे संपूर्ण पात्र पानवेलींनी आच्छादिले आहे. पुलावरून नजर टाकल्यास लॉन्स तयार झाल्याचे दिसून येते. गोदावरीचे संपूर्ण पात्र पानवेलींनी अच्छादल्याने डोळ्यांना छान दिसत असले तरी पानवेली होण्यामागे प्रदूषित पाणी कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते. यामुळे नदीकाठच्या नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आहे. (छाया : सतिश देवगिरे)

# शेतकरी संघटनेचे आंदोलन स्थगित

**नाशिक |** नुकसान झालेल्या शेतमालाचे पंचनामे पूर्ण करून त्यांना तत्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली. लवकरात लवकर नुकसानीचे पंचनामे करून आम्ही मदत जाहीर करू, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे कृषिमंत्र्यांच्या दारात कांदा ओतण्याचे आंदोलन शेतकरी संघटनेने स्थगित केले.

केशव सूर्यवंशी, भास्कर बागुल, नयन सोनवणे, महेंद्र जाधव, भिका सूर्यवंशी, त्रंबक जाधव, देवीदास अहिरे, राकेश अहिरे, संदीप सोनवणे, सुनील बिरारी, प्रवीण जाधव, प्रवीण सोनवणे, भालचंद्र वाघ, सुरज जाधव, यशवंत गुंजाळ, अविनाश जाधव, रुपेश जाधव आदींनी कृषिमंत्री कोकाटे यांची भेट घेतली. गेल्या तीन महिन्यांपासून शेतकरी स्वस्त दरात कांदा विक्री करत आहे. त्यामुळे विक्री केलेल्या कांद्याला सरासरी ३००० रुपये प्रति क्विंटल दर पकडून राज्य सरकारने भावांतर योजना लागू करावी, सरकारने ३००० रुपये क्विंटल दराने कांदा खरेदी सुरू करावे, जास्तीत जास्त कांदा निर्यात होण्यासाठी निर्यातदारांना वाहतुकीवर अनुदान द्यावे.

यावर कोकाटे यांनी सांगितले की, भावांतर योजनासाठी सरकारकडे मागणी करणार आहे. तसेच पोळ मारलेल्या कांद्याचे पंचनामे करावे. अशा अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहे. लवकरात लवकर नुकसानीचे पंचनामे करून आम्ही मदत जाहीर करू, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच इतर सर्व मागण्यांवर सकारात्मक उत्तर दिले. त्यामुळे कृषिमंत्र्यांच्या दारात कांदा ओतण्याचे आंदोलन शेतकरी संघटनेने स्थगित केले. मात्र मागण्या लवकर पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलनाची पुढची दिशा लवकरच ठरवण्यात येईल, असे बागलाण तालुका शेतकरी संघटनेचे नेते केशव सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

# बहिणींना निधी मिळतो याचा आनंद

## आदिवासी संघटनांचा सकारात्मक सूर

**नाशिक | प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाच्या निधी 'लाडकी बहीण' योजनेसाठी वळवला जात आहे. मात्र तो निधी लाडक्या बहिणींच्याच पदरात पडतो ना; त्यात आनंद आहे. त्यांच्या आनंदावर विरजण पाडण्याची इच्छा सध्या कोणालाही नाही, असा सूर आदिवासी संघटनांमधून व्यक्त होत आहे.

गेल्या काही महिन्यापासून आदिवासी विकास विभागाचा निधी वळवीला जात असल्याच्या बातम्या येत आहे.त्या बाबत आदिवासी संघटना मध्ये काही प्रतिक्रिया व्यक्त होतात का? याचा आढावा घेत असतांना सध्यातरी कोणतीही संघटना त्याबाबत ब्रशब्द बोलायला तयार नसल्याचे दिसत आहे. उलट त्यांचा युक्तीवाद असा आहे की, या योजनेचा लाभ आदिवासी महीलांनाही होत आहे. ऐकून लाभार्थी महिलामध्ये ते प्रमाण निश्चतच जास्त आहे. इतर वेळी कोणताही लाभ घेतांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. ही पहिलीच अशी योजना आहे की, जेथे फारसा त्रास न होता लाभ होत आहे. योजना सुरु होऊन आठ महिने झाले आहेत. मार्चपर्यंतचा निधी गतवर्षाच्या अर्थसंकल्पातून झाला. यंदाचा निधी दोन महिन्यापासून दिला जात आहे. सध्यातरी कोणत्याही योजनांना कात्री लागलेली नाही. त्यातच यंदाच्या अर्थसंकल्पात दहा टक्के निधी वाढवून दिला आहे. तेच पैसे वळवले आहेत. त्यामुळे आदिवासी विभागाच्या कोणत्याही योजना निधी अभावी खंडित करावी लागलेली नाही. त्यामुळे सध्या तरी एकही संघटना त्याबाबत टीका करत नाही. या विषयाला पूर्णविराम देण्याचे आवाहन खुद्द आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले असल्याने एकही लोकप्रतिनिधी त्यावर बोलताना दिसत नाही. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी विभागाला शासनामार्फत एकूण १७,००० कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. मात्र चालू वर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने विभागासाठी २१,००० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

'लाडकी बहीण' ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. आदिवासी विभागाच्या योजनांसाठी निधीची कमतरता भासत नाही. केंद्र सरकारकडूनही आदिवासी विभागास १०० टक्के निधी येत आहे.त्यामुळे सध्या तरी आपला निधी इतर वळवला म्हणून कोठेही असंतोष व्यक्त होताना दिसत नाही.

पान १ वरून

## 'मॅच फिक्सिंग'वर शिक्कामोर्तबच : चेन्नीथला

ते शिक्कामोर्तब करणारे आहे, असा टोला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी लगावला.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जे घडले ते अचानक घडलेले नाही. ते अतिशय काळजीपूर्वक आखलेले ऑपरेशन होते. लोकशाही प्रक्रियेवर एक सुनियोजित हल्ला होता. राहुल गांधी यांच्या सविस्तर विश्लेषणातून विचलित करणारे ते सत्य उलगडले आहे. एकेकाळी लोकशाहीचा दीपस्तंभ असलेल्या महाराष्ट्रात लोकशाही मूल्यांना काळीमा फासला जात आहे, हे विदारक आहे. निवडणूक आयोगाकडे काँग्रेस पक्ष सातत्याने पाठपुरावा करीत आहे, पण आयोगाकडून त्यावर समाधानकारक खुलासा केला जात नाही. केवळ वरवरची उत्तरे दिली जात आहेत. चंदिगड उच्च न्यायालायनेही हरियाणा विधानसभा निवडणूकप्रश्नी सीसीटीव्ही फुटेज देण्यास सांगितले. मात्र सरकारच्या मदतीने नियम बदलून ती माहिती देता येणार नाही, असा बदल करण्यात आला तो का व कशासाठी? असा सवाल चेन्नथिला यांनी केला आहे.

महाराष्ट्रात मतदारयाद्यांत घोटाळा करण्यात आला. बोगस मतदान करण्यात आले. मतांची टक्केवारी वाढवली. मतांची टक्केवारी सात-सात दिवस जाहीर केली नाही. हे सर्व संशायास्पद आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस व मित्रपक्षांना प्रचंड मोठा विजय मिळाला, पण पाच महिन्यात एकदम उलट परिणाम कसे येऊ शकतात? काहीतरी काळेबेरे असल्यानेच भाजप व निवडणूक आयोग लपवालपवी करीत आहे, पण हे सत्य बाहेर आणण्यासाठी काँग्रेस यापुढेही पाठपुरावा करीत राहील, असा इशारा चेन्नीथला यांनी दिला.

## प्रश्नांना वस्तुनिष्ठ उत्तर का नाही? : सपकाळ

पार्श्वभूमीवर सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाची भूमिका आणि फडणवीस यांच्या लेखावर टीका केली.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतांच्या चोरीच्या प्रश्नावर राहुल गांधी यांनी काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, पण त्याची मिरची मात्र भाजपला लागली. प्रश्न निवडणूक आयोगाला विचारले आहेत. त्यामुळे त्याची उत्तरे आयोगाने देणे अपेक्षित असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी लेख लिहून त्याची उत्तरे दिली आहेत. फडणवीस यांचा लेख हास्यास्पद असून राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुद्देसूद उत्तरे देण्याऐवजी टीका करीत जनतेला भ्रमित करण्याचा केविलवाणा प्रयत्न त्यांनी केला आहे, असा टोला सपकाळ यांनी लगावला.

राहुल गांधींनी एकूण प्रक्रियेवर उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे, पण आयोग उत्तर देत नाही, सीसीटीव्ही फूटेज देत नाही, उलट आयोगाने नियम बदलून टाकले. निवडणूक आयुक्त नियुक्तीवर फडणवीस बोलले, पण काँग्रेसच्या काळातच टी. एन. शेषन निवडणूक आयुक्त झाले आणि त्यांनी आचारसंहिता काय असते ते दाखवून दिले. भाजपच्या मोदी सरकारने तर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती पॅनलमधून सरन्यायाधीश यांना वगळून आपल्याच एका मंत्र्यांची त्या जागी वर्णी लावली हे सांगण्यास फडणवीस विसरले आहेत. फडणवीस यांच्या लेखाला लेखाने उत्तर देण्याची गरज वाटत नाही. त्यावर एखाद्या चारोळीतूनच उत्तर दिले जाऊ शकते, असा टोलाही सपकाळ यांनी लगावला.

## वाहनांची चोरी

**नाशिक | प्रतिनिधी**

शहर परिसरातून दोन दुचाकी वाहनांची चोरी झाल्याची नोंद वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, मयूर विनायक मोरे (रा. इंद्रनील अपार्टमेंट, दत्त चौक, गंगापूररोड) याची ५० हजारांची दुचाकी ३१ मे रोजी मध्यरात्री अपार्टमेंटच्या पार्किंगमधून चोरुन नेण्यात आली. गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल आहे. तर, अनिकेत गोकूळ साळुंके (रा. डीएस पार्क, श्रमिकनगर, सातपूर) यांची ७५ हजारांची दुचाकी बुधवारी (दि. ४) मध्यरात्री घरासमोर पार्क केली असता चोरट्याने चोरून नेली. सातपूर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

## भारताच्या विकासात नारीशक्तीचा सक्रिय सहभाग

उदाहरण देताना अनेक घरांत धूरमुक्त स्वयंपाकघरे आणणारा एक मैलाचा दगड म्हणून पंतप्रधानांनी उल्लेख केला. मुद्रा कर्जयोजनेमुळे लाखो महिला उद्योजक झाल्या असून त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकल्या आहेत, हेही त्यांनी नमूद केले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर घरे देण्याने त्यांची सुरक्षितता आणि सक्षमीकरणाच्या भावनेवर उल्लेखनीय परिणाम झाला आहे. पंतप्रधानांनी बेटी बचाओ बेटी पढाओ मोहिमेची आठवण काढत ही चळवळ मुलींच्या संरक्षणासाठी एक राष्ट्रीय चळवळ असल्याचा उल्लेख केला.

विज्ञान, शिक्षण, खेळ, स्टार्टअप्स आणि सशस्त्र दलांसह सर्व क्षेत्रांमध्ये महिला उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत आणि अनेकांना प्रेरणा देत आहेत.

पंतप्रधानांनी ङ्गएक्सफ या सामाजिक माध्यमांवर देशाच्या विकासात महिलांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल भाष्य केले आहे. आपल्या माता, बहिणी आणि मुलींनी असे काही दिवस पाहिले आहेत, त्यावेळी त्यांना प्रत्येक पावलावर अडचणींना तोंड द्यावे लागायचे. परंतु, आज त्या केवळ विकसित भारताच्या संकल्पात सक्रियपणे सहभागीच होत नाहीत तर शिक्षणापासून व्यवसायापर्यंत प्रत्येक क्षेत्रात उदाहरणेदेखील निर्माण करीत आहेत. गेल्या ११ वर्षातील नारीशक्तीचे यश सर्व नागरिकांसाठी अभिमानाची बाब आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## ... और आईना पोछते रहे : फडणवीस

अनुसूचित जमाती यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना त्यांच्या हेडखालीच दाखवाव्या लागतात. त्याची तरतूदही त्या हेडखालीच करावी लागते. म्हणूनच अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना त्या हेडखाली ती तरतूद केली आणि आम्ही रेग्युलर तरतुदीपेक्षा किती जास्तीची तरतूद केली आहे व ती कशाकरता वापरणार आहोत? ते भाषणात सांगितले.

दुसऱ्या कामाकरता एखादा निधी ठेवला असेल व तो तिसऱ्या कामावर खर्च केला जातो, तेव्हा निधी वळवला असे आपण म्हणतो. अर्थसंकल्पात कायद्यानेच तुम्हाला त्या विभागाकरता किंवा त्या घटकाकरता जो पैसा खर्च होतो तो त्या घटकाच्या मंत्रालयात दाखवावा लागत असेल तर ते दाखवणे चूक नाही. पैसा कुठेही वळवलेला नाही. त्या विभागातच तो पैसा दाखवणे हा अर्थसंकल्पाचा नियम आहे. त्याचप्रमाणे ते अर्थसंकल्पात दाखवलेले आहे आणि त्यातून तो खर्च केला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## भेटीवेळी उत्तर देऊ

निश्चितच उत्तर देतो आणि देत आलो आहोत, असे आयोगाने म्हटले आहे. राहुल गांधी यांनी आयोगाशी संवाद साधण्याऐवजी वारंवार माध्यमांतून आरोप करणे आश्चर्यकारक आणि खेदजनक आहे, असे मत आयोगाने व्यक्त केले आहे. प्रसार माध्यमांतून प्रश्न उपस्थित करण्याऐवजी राहुल यांनी थेट निवडणूक आयोगाशी पत्रातून संपर्क साधावा, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे.

भारत निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाला २४ डिसेंबर २०२४ ला सविस्तर उत्तर पाठवले आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर त्यात स्पष्ट आणि तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे. या अधिकृत पत्रव्यवहारानंतरही राहुल गांधी यांनी माध्यमांतून पुन्हा शंका आणि आरोप मांडल्याबद्दल आयोगाने खेद व्यक्त केला आहे.

निवडणूक आयोगाकडे विचारलेल्या अधिकृत प्रश्नांना उत्तर देण्याची आमची प्रक्रिया पारदर्शक आणि ठोस आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

हा संवाद माध्यमांमधून न करता थेट आयोगाशी केल्यास, लोकशाही प्रक्रियेस अधिक बळकटी मिळेल आणि संवाद अधिक परिणामकारक ठरेल, असे भारत निवडणूक आयोगाने सांगितले आहे.

## डिसेंबरअखेर सर्व शासकीय कार्यालयांत सौरऊर्जा वापर

महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षांत देशात ४ लाख कृषिपंप बसवण्यात आले असताना राज्याने अपारंपरिक ऊर्जा वापराला प्रोत्साहन देऊन ५ लाख सौर कृषिपंप बसवले. मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनीतून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौरऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजित पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली आहे, असे फडणवीस म्हणाले.

### वीजदर घटणार


महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौरऊर्जा निर्मितीत देशात महाराष्ट्र अग्रेसर आहे. विभाजित पद्धतीने सौरऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात महाराष्ट्राने महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. कुसुम योजनेच्या अंमलबजावणीतही आपण पुढे आहोत. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत शेतीची संपूर्ण विजेची मागणी सौरऊर्जेवर परिवर्तीत करू शकू. गेल्या २० वर्षात दरवर्षी विजेचे दर ९ टक्क्यांनी वाढवत आलो आहोत. मात्र २०२५ ते २०३० मध्ये दरवर्षी विजेचे दर कमी केले जातील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## यंदाचे साहित्य संमेलन साताऱ्यात

करण्यासाठी ३ सभागृहे उपलब्ध आहेत. स्टेडियममध्ये २५,००० प्रेक्षक क्षमता असलेली गॅलरी आहे. हे ठिकाण सातारा बस स्थानकापासून पायी चालत जाण्याच्या अंतरावर आहे. शहराच्या मध्यभागी असल्याने शहरातील आणि बाहेरून येणाऱ्या साहित्य रसिकांची सोय होणार आहे. स्टेडियमच्या पाठीमागील बाजूस पोलिस परेड मैदानाची ८ एकर जागा आहे. तिचा वापर वाहनतळासाठी करता येणार आहे.

संमेलनासाठी मार्गदर्शन समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात प्रा मिलिंद जोशी, गुरय्या स्वामी, सुनिता राजे पवार, विनोद कुलकर्णी, प्रदीप दाते, दादा गोरे आणि डॉ उज्ज्वला मेहेंदळे यांचा समावेश आहे.

## शब्दकोड : २६९



**आडवे शब्द** : १) माशाची एक प्रसिद्ध जात. ४) कमीज बरोबरचे वस्त्र. ७) पायापर्यंत पोहोचणारा अनेक पदरी हार. ११) मादीच्या विरुद्ध. १२) कुस्ती खेळणारा. १४) फुरसत. १५) कोवळा अंकुर. १७) वर्ण. १८) रक्ताने भरलेला. २०) खूप मोठी नदी (हिंदी)२२) कारण. २५) लावणी असलेला नाट्यप्रकार. २७) फक्त, केवळ. २८) निरुद्योगी. ३३) श्रीरामाचे स्तोत्र. ३५) बंगाली भाषेत रुपया. ३६) किंचित छोटासा. ३८) देश (हिं). ३९) वडीलांचा भाऊ. ४०) गप्प बसण्याचे एक व्रत. ४१) युद्धातील समेट. ४२) मृत्यू ४४) कणीदार. ४६) ढाल ****. ४८) हस्त. ५०) ज्ञानेश्वर, तुकाराम इ. ५२) ** नांदगावकर, मनसेचे नेते ५३) ''कोंबडी शिवाय ऊरुस नाही आणि ----'' एक वाक्प्रचार. ५६) फार मोठा. ५७) टिंगल, चेष्टा. ५९) छोटी ताटली. ६१) कापडाची विण. ६२) आत्मियता, प्रेम. ६४) हिंदीत बेपत्ता. ६६) वर्ष, साल. ६८) शर्करा. ७०) आकाश. ७२) पुण्याचा रहिवासी. ७३) बगळा. ७५) गरज असलेला गरजू. ७६) असामान्य.

**उभे शब्द** : १) पर्ण. २) फुलांची टोपली. ३) गाडीचे छत. ४) अखंड. ५) सत्ता. ६) मोठे माकड. ७) गावातील जुनी वस्ती. ८) पश्चिम दिशा. ९) रेशीमाची गुंडाळी. १०) पाण्याने भरलेला ढग. १३) गणेशाचे एक नाव. १६) ऊसाचे पेय. १९) बांधलेला. २०) धुंदी, कैफ. २१) दोन महान ग्रंथ. २३) अचानक आलेले संकट. २४) हट्ट, दुराग्रह. २६) मौजणे. २८) तीन चाकी वाहन. २९) जुगाराचा एक प्रकार. ३०) टेकू, आधार. ३१) मोठी टोपली. ३२) युद्धातील एक घोषणा. ३३) मंदोदरीचा पती. ३४) धावणारा (इं.). ३७) सातूचे पीक. ३९) मृत्यू, वेळ. ४०) गंमत, मजा. ४३) रत्न. ४५) शाब्दिक भांडण. ४६) पूर्ण नाश (हिं.) ४७) प्रेम, जिव्हाळा. ४९) अत्यंत गरजेच्या वेळी. ५०) संपणे, लयास जाणे. ५१) वृक्ष. ५४) क्रिकेटमधील ओव्हर. ५५) श्रीफळ. ५८) परिचय. ६०) चूकच्या विरुद्ध. ६३) जेमतेम. ६५) तसराळे. ६७) नाकाला खड्डा असलेला. ६९) खोडण्याचे साधन. ७०) शरीर. ७१) मातीचा कण. ७२) सुमन. ७४) पदार्थाचा सूक्ष्म भाग.

### शब्दकोड२६८चे उत्तर

